॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# *प्रथम वर्ष बी. एफ. ए. (ॲप्लाईड आर्ट)*
# *अभ्यासक्रम*

(२००९ जून पासून)

# `` उच्चकला सुधारीत अभ्यासक्रमासंबंधी थोडेसे ``

कालानुरूप गरजा बदलू लागल्यात, निकस बदलू लागलेत दृश्यकलेची माध्यमे बदलू लागलीत, त्यांचे स्वरूप बदलू लागले. संगणकाने तर कमालच केली. साहजिकच सुधारीत अभ्यासक्रमात त्याची दखल घेणे आवश्यकच आहे आणि काळाच्या गरजेप्रमाणे अभ्यासक्रमात बदल करण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे.

उपयोजित कलेत बी. एफ. ए. च्या पदवी अभ्यासक्रमात प्रथम वर्षापासूनच अंतिम वर्षापर्यंतच्या अभ्यासक्रमात सुधारणा आवश्यक असल्याने तसे बदल प्रथम वर्षाच्या अभ्यासक्रमा पासूनच करायचा प्रयत्न केलेला आहे. दिवसेंदिवस कला क्षेत्रात अनेक तांत्रिक सुधारणा होत आहेत. संगणकीय सुधारणेबरोबरच डिजीटल क्षेत्रात मोठी क्रांती झालेली आहे. उपयोजित कलेतील जाहीरात क्षेत्रात, तसेच ॲनीमेशन क्षेत्रात प्रशिक्षित मनुष्य बळाची मोठ्या प्रमाणात आवश्यकता आहे. त्या ठिकाणी मोठ्याप्रमाणात उपयोजित चित्रकारांची गरज भासत आहे. अशावेळी अद्यावयात उपयोजित कलेचे ज्ञान असलेले कलावंत प्रशिक्षित होणे गरजेचे आहे. हे उद्दीष्ट लक्षात घेऊन उपयोजित कलेच्या पदवी अभ्यासक्रमात सुधारणा होणे आवश्यक असल्याने हे बदल सुधारीत अभ्यासक्रमात करण्यात आलेले आहे. आशा आहे. काळाची गरज हे प्रशिक्षित कलावंत पूर्ण करू शकतील.

# उपयोजित कला (पदवी अभ्यासक्रम )
# बी. एफ. अे. ( अप्लाईड आर्ट ) सुधारीत अभ्यासक्रम

**१) अभ्यासक्रमाचे नाव - बी. एफ. अे. ॲप्लाईड आर्ट**

**(उपयोजित कला पदवी अभ्यासक्रम)**

**२) पदवी अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांची शैक्षणिक पात्रता -**

अ) महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाची कोणत्याही शाखेची बारावी परीक्षा (एच. एस. सी.) उत्तीर्ण असणे आवश्यक

ब) सदर विद्यार्थ्याने महाराष्ट्र राज्याच्या कला संचालनालयाच्या अखत्यारीतील ड्रॉईंगची इंटरमिजीएट ग्रेड परीक्षा उत्तीर्ण असले पाहिजे

किंवा

११ वी, १२ वीला चित्रकला विषय घेतलेला असला पाहिजे.

किंवा

सदर विद्यार्थ्याने दहावी परीक्षेमध्ये (एस. एस.सी.) चित्रकला विषय घेऊन उत्तीर्ण असले पाहिजे.

किंवा

तात्पुरता प्रवेश देवून इंटरमिजीएट ग्रेड पास होण्याच्या अटीवर प्रवेश देण्यास हरकत नाही. मात्र ही सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यावर राहील.

क) सदर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना बारावीच्या व ड्रॉईंग परीक्षेतील किंवा दहावीच्या परीक्षेतील चित्रकला विषयात मिळालेल्या गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येईल.

ड) प्रथम वर्ष उपयोजित कला या वर्गासाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठ नियमानुसार ७५% हजेरी व वर्गकामात ४०% गुण आवश्यक असून ते पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यास वार्षिक परीक्षेला बसता येईल. ही अट पूर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्यास परीक्षेला बसू दिले जाणार नाही.

कोणत्याही वर्गाच्या परीक्षेस पास होण्याकरीता प्रात्यक्षिक विषयात कमीत कमी १०० पैकी ३५ गुण असणे आवश्यक आहे. तसेच सैध्दांतिक ( थेअरी ) कोणत्याही विषयात पास होण्याकरीता १०० पैकी कमीत कमी ३० गुण मिळविणे आवश्यक आहे. तसेच सर्व विषयातील मिळविलेल्या गुणांची सरासरी ४०% आवश्यक आहे. अे. टी. के. टी. चे नियम आर्टस आणि फाईन आर्टस फॅकल्टीच्या प्रचलित नियमाप्रमाणेच असतील.

## प्रथम वर्ष उपयोजित कला (बी. एफ. अे.) वार्षिक परीक्षेचे नियोजन

## ( आवश्यक विषय व गुणांचा तक्ता) परीक्षेचा पॅटर्न

| अ. क्र. | विषय | एकूण तास | वर्गकामाचे गुण | परीक्षेचे गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|---|
| | **सैधंतिक विषय ( Theory )** | | | | |
| १. | जाहिरात | ३ | २० | ८० | १०० |
| २. | दृककला विचार प्रसारण शास्त्र इतिहास | ३ | २० | ८० | १०० |
| | **प्रात्यक्षिक विषय ( Practical Subject )** | | | | |
| ३. | मानवी चेहऱ्याचा रेखाटन अभ्यास | ५ | २० | ८० | १०० |
| ४. | निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वस्तुंचा अभ्यास | ५ | २० | ८० | १०० |
| ५. | द्विमितीस संकल्प व रंगाचा अभ्यास | ५ | २० | ८० | १०० |
| ६. | ग्राफीक डिझाईन | ५ | २० | ८० | १०० |
| ७. | अक्षरांकन व सुलेखन | ५ | २० | ८० | १०० |
| ८. | रचना चित्र | ५ | २० | ८० | १०० |
| | एकूण गुण | | १६० | ६४० | ८०० |

## वार्षिक परीक्षेत सर्व विषयामध्ये उत्तीर्ण होण्यासाठी गुणांची पात्रता :-

१. सैधंतिक विषयात (Theory) वर्गकामामध्ये (टयसुटेरियल्समध्ये) कमीत कमी ४० टक्के गुण आवश्यक

२. प्रात्यक्षिक (Practical) विषयात सुध्दा वर्गकामात कमीत कमी ४० टक्के गुण आवश्यक आहेत.

३. वर्गकामात २० गुणांपैकी कमीत कमी ८ गुण परीक्षेस बसण्यासाठी आवश्यक असून वार्षिक परीक्षेत सैधंतिक विषयात ८० पैकी २४ गुण व प्रात्यक्षिक परिक्षेत वार्षिक परीक्षेत८० पैकी २८ गुण पास होणेकरीता मिळणे आवश्यक आहे.

४. सैधंतिक व प्रात्यक्षिक या दोन्ही विषयात एकत्रितपणे ५० टक्के गुण मिळाले असल्यास द्वितीय श्रेणी धरण्यात येईल.

५. सैधंतिक व प्रात्यक्षिक या दोन्ही विषयात एकत्रितपणे ६० टक्के गुण व त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असल्यास प्रथम श्रेणी धरण्यात येईल.

६. सैधंतिक व प्रात्यक्षिक या दोन्ही विषयात एकत्रितपणे ७० टक्के गुण व त्यापेक्षा अधिक गुण मिळाले असल्यास प्रथम श्रेणीतील विशेष प्राविण्य धरण्यात येईल.

## प्रथम वर्ष - बी.एफ.अे. उपयोजित कला (सुधारीत अभ्यासक्रम) अध्यापन तक्ता

| अ.क्र. | विषय | एकूण तास | वर्गकाम व स्वाध्याय |
|---|---|---|---|
| | **सैधंतिक विषय ( Theory )** | | |
| १. | जाहिरात कला आणि कल्पना<br>ADVERTISING ARI & IDEAS | ०६० | ०६ |
| २. | दृककला विचार प्रसारण शास्त्र इतिहास<br>HISTORY OF VISUAL COMMUNICATION | ०६० | ०६ |
| | **प्रात्यक्षिक विषय ( Practical Subject )** | | |
| ३. | मानवी चेहऱ्याचा रेखाटन अभ्यास<br>DRAWING (HEADSTUDY) | ०९० | ०८ |
| ४. | निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वस्तुंचा अभ्यास<br>OBJECT & NATURE DRAWING | ०९० | ०६ |
| ५. | द्विमितीस संकल्प व रंगाचा अभ्यास<br>२-D DESIGN & COLOURS | ०९० | ०६ |
| ६. | ग्राफीक डिझाईन<br>GRAPHIC DESIGN | ०९० | ०६ |
| ७. | अक्षरांकन व सुलेखन<br>TYPOGRAPHY/CALLIGRAPHY | ०९० | ०८ |
| ८. | रचना चित्र<br>LAYOUT | १२० | ०८ |
| *९. | यथार्थ दर्शन<br>PERSPECTIVE | ०३० | ०४ |
| *१०. | त्रिमीतीय संकल्प<br>३-D DESIGN | ०९० | ०४ |
| *११. | स्मरण चित्र<br>MEMORY DRAWING | ०९० | ०६ |
| *१२. | व्हिजुअलायझेशन<br>VISUALASATION | ०६० | ०४ |
| | | ९६० | ७२ |

* सदर विषय परीक्षेसाठी नाहीत परंतु विद्यार्थ्यांना विषयांची माहिती व्हावी म्हणून अध्यापनात समाविष्ट केलेले आहेत. परंतु त्यांच्या या विषयाच्या अंतर्गत २० गुणांपैकी मिळालेले गुण वार्षिक परीक्षेत धरले जातील.

# विषयांचा सविस्तर अभ्यासक्रम :-

## सैधंतिक विषय ( Theory ) :-

### १. जाहिरात कला आणि कल्पना (Advertising Art & Ideas) :-

जाहिरातींची प्राथमिक माहिती, जाहिरात माध्यमांची निरिक्षणे, सर्वस्थितीतील जाहिरात माध्यमांची ओळख, जाहिरातीमधील महत्वाच्या घटकांचा उदा. प्रतिक चिन्ह, वस्तू, चित्र किंवा छायाचित्र, शिर्षक, विविध आकारातील जाहिरातींचा अभ्यास, जाहिरातीची विविध माध्यमे - उदा. छापील माध्यमे, होर्डींग्ज, पोस्टर्स इ. इलेक्ट्रानिक्स माध्यमे ( टी. व्ही., रेडीओ इ. ) प्रसार माध्यमे त्यांचे परिणाम व हेतु, प्रत्येक जाहिरात माध्यमांचा अभ्यास, विद्यार्थ्यांचा वैयक्तिक सहभाग आणि त्यांचे निरीक्षण, विविध वस्तुंच्या जाहिराती वस्तुंची वर्गवारी नियमित वापरल्या जाणाऱ्या व टिकाऊ वस्तुंच्या जाहिराती आणि वर्गवारी, बँक, प्रवासी संख्या, हॉटेल्स, आर्थिक व वैद्यकीय सेवेच्या जाहिराती, वस्तुंच्या जाहिरातींपेक्षा सेवा देणाऱ्या संस्थांच्या जाहिरातीमधील फरक, समाज ग्राहक नातेसंबंध, लोक आणि त्यांचा जाहिरात माध्यमात व विपणन व्यवस्थेतील सहभाग समाजातील वर्गवारी, समाजातील विविध आर्थिक गट, शिक्षण वयोमर्यादा, स्त्री-पुरुष त्यांचे जगण्याचे मार्ग जाहिरातीमधील पार्श्वभूमी, प्राचीन व मध्ययुगीन १५ व्या व १७ व्या शतकातील जाहिरातकला औद्योगिक क्रांतीनंतरचा व आजपर्यंतचा जाहिरातीमधला परीणाम व बदल, सध्याची निरीक्षणे व जागतिक बाजाराचा परीणाम, स्पर्धा व पर्यावरण संबंधित जाहिरातीमधील प्रतिबिंब, सध्याच्या पिढीचे उद्याच्या जाहिरात कलेती योगदान.

### २. दृककला विचार प्रसारण शास्त्र इतिहास
### (History of Visual Communication) :-

विचारप्रसारणाचे, सुसंवादाचे सर्वसाधारण नियम शास्त्रशुध्द पध्दती, प्राचीन संस्कृती पासून आजपर्यंत मानव कशा रीतीने सुसंवाद करीत आहे. त्यांचे हावभाव, शब्दविना भाव भावनांचे जोरकस प्रगटीकरण, संकल्प विचारांचे आदानप्रदान, विचार पटवण्याच्या पध्दती-सुचना-माहिती- प्रश्न - चौकशी - आदेश - प्रतिसाद आणि पाठपुराव्याचे महत्व.

ज्ञान विकासासाठी पंचेंद्रियांचे महत्व - मेंदुचे कार्य आणि त्याच्यात निर्माण होणाऱ्या संवेदना त्यांच्या विचारांचे पृथ:करण वृत्ती - निकाल - सुधारणा, प्रयोगात्मक पध्दती - सभोवतालचा परिणाम - निसर्गाचा होणारा परीणाम - आवाज - दृकप्रतिमा तसेच सुमेरिया, मेसोपोटेमिया, इजिप्त, ग्रीस आणि रोमन या संस्कृतीतील शिलालेखांचा अभ्यास - ख्रिस्त प्रतिके - बौध्दप्रतिके - वैदिक प्रतिके - धार्मिक चिन्हे यांची ओळख - त्यातील आकारांचा अभ्यास त्यातील बिंदू - रेषा - अवकाश दृकप्रतिमांचे विभाजन त्याबाबत माहिती, अक्षरे आणि क्रमांक, क्युनिफॉर्म व हिरोग्लीफ यांचे अर्थ व त्यांचे बोधचिन्हांचे उद्देश्य - चित्र, रेखाटन, पेंटींग यांचे विकसीत रूप, गुहाचित्रे, पॉटपेन्टिंग- पिरॅमिड आणि ग्रीकमधील भित्तीचित्रे रोमन आणि ख्रिस्तपूर्व पेंटींग - रेनेसन्स पासून १५ ते १८ व्या शतकातील चित्रकला-वास्तववादी पासून अमुर्त-आधुनिक कलेपर्यंतचे केलेचे वाद-शास्त्र-मानसशास्त्र-तत्वज्ञान-साहित्य-कविता-अद्‌भुतता-जुन्या इमारती, त्यांच्या कमानी, आतील व बाहेरील भागांचा अभ्यास, मंदीरे, चर्चेस, किल्ले, राजवाडे आणि आधुनिक इमारतीचा अभ्यास, सुपरमार्केट, डिस्प्लेडिझाईन्स आणि मनोरंजनात्मक घरांची तात्पुरती उभारणी इ. चा अभ्यास.

## प्रात्यक्षिके - (Practicals) :-

### ३. मानवी चेहऱ्याचा रेखाटन अभ्यास (Head Study) :-

विविध मानवी चेहऱ्यांच्या वेगवेगळ्या अंगाने अभ्यास त्यांची शरीरशास्त्रानुसार रचना यांचा सर्वांगीण अभ्यास वेगवेगळी माध्यमे उदा. पेन्सिल, रंग, स्केचपेन, इंकपेन, पेस्टल आदींच्या माध्यमातून अभ्यास, छायाप्रकाशाचा अभ्यास, प्रमाणबध्दता, पोत, रचना, स्केचेस.

### ४. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित वस्तुंचा अभ्यास (Nature & Object Drawing) :-

विविध मानवी चेहऱ्यांचा वेगवेगळ्या अंगाने अभ्यास त्यांची शरीराशास्त्रानुसार रचना यांचा सर्वांगिण अभ्यास वेगवेगळी माध्यमे उदा. पेन्सिल, रंग, स्केचपेन, इंकपेन,

पेस्टल आदींच्या माध्यमातून अभ्यास, छायाप्रकाशाचा अभ्यास, प्रमाणबध्दता, पोत, रचना, स्केचेस.

### ५. द्विमितीस संकल्प व रंगाचा अभ्यास (२-D Design & Colour) :-

द्विमितीय अवकाश आणि विविध रचनेची शक्यता यांचा अभ्यास, ग्राफ पध्दती, रचनेतील सुवर्णमध्य, अवकाश आणि आकार यांचे विविध दृक प्रतिमांचे अनुभव, बिंदूरेषा, आकार, घनाकार, पोत, छायाप्रकाश आणि रंग यांच्या जाणिवा विकसित करण्याच्या दृष्टीने अभ्यास रचनेची सुत्र, तोल, लय, एकात्मता, सुसंवाद, एकता, पुनरार्वृत्ती, उत्सर्जन, विविध रंगसंगतीचा अभ्यास, रंग विरोधाभास, रंग सुसंवाद, विविध साहित्यांचा द्विमीतीय रचनेसाठी उपयोग उदा. पेन, ब्रश, रंग, पेन्सिल, मिश्रमाध्यम, रंगलेपनाच्या विविध पध्दती, कोलाज, प्रिंटमेकींग, स्टेन्सिलप्रिंट इ. चा उपयोग पारंपारिक-लोककला - वास्तववादी प्रतिकात्मक - अमूर्त-भौमितीक संकल्पनेचा अभ्यास.

### ६. ग्राफीक डिझाईन (Graphic Design) :-

अक्षर आणि दृकप्रतिमा यांची एकत्रित मांडणी, विचार प्रसारणाच्या दृष्टीने त्यातील महत्व समजणे - पृथःकरण करणे आणि विकसीत करणे या दृष्टीतून ग्राफीक डिझाईनचे महत्व, बोधचिन्हे, प्रतिके, दृकप्रतिमा व्यापारचिन्हे निसर्गनिर्मित व मानवनिर्मिता वस्तुंच्या आकाराचे प्राथमिक स्वरूप.

### ७. अक्षरांकन व सुलेखन (Typography & Calligraphy) :-

रोमन व देवनागरी अक्षरांचा अभ्यास-प्राचीन काळापासून अक्षरांचे बदलत जाणारे रूप आणि इतिहास-विविध माध्यमातून अक्षरांचा अभ्यास सुलेखनाच्या प्राचीन काळापासून असणाऱ्या विविध पध्दती-रोमन आणि देवनागरी सुलेखन-त्यासाठी उपयोगात येणारी साधने पेन, बोरू, कटनीप व ब्रश, कुकवेल, टाक, इंक, रंग माध्यमे - वेगवेगळ्या संस्कृतीमधील सुलेखन पध्दतींचा अभ्यास -प्रत्येक अक्षरांचे वैविध्यपूर्ण रूप यांचा अभ्यास अक्षरांमधील

प्रत्येक अक्षरातील सकारात्मक व नकारात्मक अवकाश - प्रत्येक अक्षर हे चित्र म्हणून एक अभ्यास - प्रत्येक अक्षर एक वेगळे वैशिष्ट्यपूर्ण रूप रोमन सुलेखनाच्या पध्दती.

## ८. रचना चित्र (Layout) :-

द्विमितीय रचनेतील सुवर्णमध्य व वैशिष्ट्ये, रचनाचित्रासाठी लागू पडतात. उपयोजित कलेच्या दृष्टीने व विचार प्रसारणाचे महत्व लक्षात घेऊन रचनाचित्र तयार करणे महत्वाचे आहे. सुवर्णमध्य साधणे-ग्राफ पध्दती - दृष्टी सर्वीकडे फिरणे या दृष्टीने रचनाचित्र तयार करणे - तोल, लय, पोत यांचा वापर - उपयोजित कलेतील जाहिरातीतील विविध माध्यमे - भित्तीचित्रे (Posters), होर्डींग्ज (Hordings), मासिके (Magazine), वृत्तपत्रे (Presslayout) इ. साठी जाहीरातींचा अभ्यास, काळ्या, पांढऱ्या व रंगीत जाहिरातींचा अभ्यास.

## ९. यथार्थ दर्शन (Perspective) :-

एक बिंदू, दोन बिंदू आणि तीन बिंदू या विविध प्रकारच्या यथार्थदर्शनाचा अभ्यास - त्रिमिती-वस्तूचा द्विमीतीच्या अंगाने यथार्थदर्शनात्मक अभ्यास - समांतर आणि कोनात्मक यथार्थदर्शन घन आकाराचे आराखडा आणि बाजू यांचा अभ्यास, एखाद्या वस्तूचा किंवा इमारतीचा पक्षाच्या नजरेतून दिसणारे (Bird eye view) यथार्थदर्शन व जमिनीपासून आकाशाकडे अंगाने दिसणारे यथार्थदर्शन यांचा अभ्यास.

## १०. त्रिमीतीय संकल्प (३-D Design) :-

संकल्पनेची सर्व सुत्रे त्रिमितीय रचनेसाठी आवश्यक आहेत. त्रिमिती, रचनेतील बांधणी आणि अवकाश यांची जाणीव विकसीत करणे - सौंदर्यशास्त्राच्या दृष्टीने त्रिमीतीची रचना तसेच विविध माध्यमातून उपयोजित - त्रिमितीय रचना साकारणे उदा. पेनस्टँड, स्मृतिचिन्ह, शिल्प ( पेपर, कार्डबोर्ड, माती, तार, वायर, प्लॉस्टर ऑफ पॅरीस, मेन इ. माध्यमातून त्रिमितीय रचना साकारणे.)

## ११. स्मरणचित्र (Memory Drawing) :-

लोकजीवनावर आधारीत विविध प्रसंगांचे चित्रण - त्यांच्या वेशभूषा- विविध प्रसंग - खेळ- उत्सव - दैनंदिन जीवन इ. वर आधारीत ग्रामीण व शहरी विविध - दैनंदिन जीवनाचा अभ्यास.

## १२. व्हिजुअलायझेशन (Visualasation) :-

उपयोजित कलेसंबंधित विविध समस्यांचे - निवारण - संकल्पना -विचार यांचा अभ्यास विविध तांत्रिक कौशल्य आणि ज्ञान याची जाणीव करून देणे. पुनरुत्पादनाच्या दृष्टीने ज्ञान, दृकप्रतिमांचे ज्ञान व शिक्षण या दृष्टीने विविध दृकमाध्यमांचा उपयोग विशेषत्वाने करून संकल्पना साकारणे - हस्तकौशल्य आणि तंत्रकौशल्य विकसीत करणे - कल्पकता आणि कल्पना शक्तीचा उपयोग करणे कलात्मक व परिणामकारक दृकप्रतिमा साकारणे.

सही/-

प्रा. सी. एन. पाटील

अध्यक्ष, ललीत कला अभ्यास मंडळ